# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** दिनांक १० जुन, २०२४ रोजी मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेत झालेल्या
**{परिवहन विभाग}** सभेत मोरभवन येथे शहरबस पार्किंग व आवागमनाचे जागेत कुठेही पाणी जमा न होण्यासाठी या संपुर्ण जागेचे कठिणीकरण व समतलीकरण करणे, १२ मीटर WBM रोड व डेपो अंतर्गत रस्ते तयार करणे, पावसाळ्याचे पाणी वाहुन जाण्यासाठी नाली तयार करणे, प्रवासी व स्टाफ करिता पाण्याची व्यवस्था करणे, पाणी पुरवठ्यासाठी अनुषंगीक सोयीसुविधा करणे, सुलभ कॉम्लेक्स तयार करणे, इ, कामाकरिता प्रावधान उपलब्ध करून देण्यास्तव पुर्नविनियोजन प्रस्ताव तयार करणेबाबत परिवहन विभागाला सुचित करण्यात आले होते.

त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पात लेखाशिर्ष क्रमांक B४०६८०३७०३०४ “प्रकिर्ण लोकसुधार कार्य भुअर्जन तथा डपो संबंधीत विकास कामे” या लेखाशिर्षाअंतर्गत रू. १००.०० लक्ष निधी उपलब्ध आहे.

उपरोक्त कामाकरिता हा निधी पुरेसा नसल्यामुळे व पर्याप्त निधी उपलब्ध व्हावा याकरिता “निर्देशक फलक उभारणे तथा मोरभवन येथे कंटेनर कॅबिन ऑफीस तयार करणे” या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध निधी रू. १००.०० लक्ष पैकी रू. ९९.०० लक्षचा निधी हा लेखाशिर्ष पद क्रमांक B४२५८०३७०९०५ “प्रकिर्ण लोकसुधार कार्य भुअर्जन तथा डपो संबंधीत विकास कामे” या लेखाशिर्षात पुर्नविनियोजीत केल्यास रू. १९९.०० लक्षचा निधी “प्रकिर्ण लोकसुधार कार्य तथा डेपोसंबंधी विकास कामे” या लेखाशिर्षात उपलब्ध होईल.

यास्तव उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पुर्नविनियोजन प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 77/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 23/07/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार दिनांक १० जुन, २०२४ रोजी मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेत झालेल्या सभेत मोरभवन येथे शहरबस पार्किंग व आवागमनाचे जागेत कुठेही पाणी जमा न होण्यासाठी या संपुर्ण जागेचे कठिणीकरण व समतलीकरण करणे, १२ मीटर WBM रोड व डेपो अंतर्गत रस्ते तयार करणे, पावसाळ्याचे पाणी वाहुन जाण्यासाठी नाली तयार करणे, प्रवासी व स्टाफ करिता पाण्याची व्यवस्था करणे, पाणी पुरवठ्यासाठी अनुषंगीक सोयीसुविधा करणे, सुलभ कॉम्लेक्स तयार करणे, इ, कामाकरिता प्रावधान उपलब्ध करून देण्यास्तव पुर्नविनियोजन प्रस्ताव तयार करणेबाबत परिवहन विभागाला सुचित करण्यात आले होते.

त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पात लेखाशिर्ष क्रमांक B४०६८०३७०३०४ "प्रकिर्ण लोकसुधार कार्य भुअर्जन तथा डपो संबंधीत विकास कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत रू. १००.०० लक्ष निधी उपलब्ध आहे.

उपरोक्त कामाकरिता हा निधी पुरेसा नसल्यामुळे व पर्याप्त निधी उपलब्ध व्हावा याकरिता "निर्देशक फलक उभारणे तथा मोरभवन येथे कंटेनर कॅबिन ऑफीस तयार करणे" या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध निधी रू. १००.०० लक्ष पैकी रू. ९९.०० लक्षचा निधी हा लेखाशिर्ष पद क्रमांक B४२५८०३७०९०५ "प्रकिर्ण लोकसुधार कार्य भुअर्जन तथा डपो संबंधीत विकास कामे" या लेखाशिर्षात पुनर्विनियोजीत केल्यास रू. १९९.०० लक्षचा निधी "प्रकिर्ण लोकसुधार कार्य तथा डेपोसंबंधी विकास कामे" या लेखाशिर्षात उपलब्ध होईल.

यास्तव उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पुनर्विनियोजनच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.